**समक्ष अध्यक्ष, मोटार अपघात प्रकरणे न्यायाधिकरण, वर्धा**
**एम.ए.सी.पी (एम.ए.एन.आर.जे.आय.) क्र. ६८/२०२६**
**नंदा शंकरराव सहारे (नंदा कैलास नेवारे लग्नानंतरचे नाव) –वि.– निरंक**

**आदेश नि. क्र. १ वर पारित**
**दिनांक ०७/०९/२०२६**

मोटार अपघात दावा प्रकरण क्र. ०६/१९९० दिनांक ३०/११/१९९२ रोजी निकाली काढण्यात आले. सदर प्रकरणातील न्यायनिर्णयानुसार गैरअर्जदार यांनी रक्कम न्यायालयात जमा केली होती. सदर रकमेपैकी मुळ प्रकरणातील अर्जदार क्र. २ नंदा शंकरराव सहारे हीचे नावे रक्कम **रु. १,४५,७७६/– (अक्षरी रुपये एक लाख पंचेचाळीस हजार सातशे छाहत्तर फक्त)** ती अज्ञान असल्यामुळे मुदतठेवी मधे ठेवण्यात आली होती. ती रक्कम मिळण्याकरीता मुळ प्रकरणातील अर्जदार क्र. २ नंदा शंकरराव सहारे (नंदा कैलास नेवारे लग्नानंतरचे नाव) यांनी अर्ज केलेला आहे.

उपरोक्त मोटार अपघात प्रकरण ०६/१९९० मधे अर्जदार नंदा शंकरराव सहारे हीचे नावे रक्कम **रु. १,४५,७७६/– (अक्षरी रुपये एक लाख पंचेचाळीस हजार सातशे छाहत्तर फक्त)** ही एफ.डी.आर. खाता क्र. ०१२९२०२८९६४०१ नुसार भारतीय स्टेट बॅक, शाखा ट्रेझरी वर्धा येथे दिनांक १९/०४/२००६ नुसार जमा असुन त्याची मुदत दिनांक २८/०५/२०१० रोजी संपली असल्याबाबतचा अहवाल वरिष्ठ लिपीक(मोटार अपघात), रोख व वित्त विभाग, जिल्हा न्यायालय, वर्धा यांनी दिलेला आहे.

सदर प्रकरणात अर्जदारची आई मुळ प्रकरणातील अर्जदार क्र. १ विमल शंकर सहारे हीने अर्जदार क्र. २ नंदा शंकरराव सहारे ही माझी मुलगी असुन तिचे लग्नानंतरचे नाव नंदा कैलास नेवारे असल्याबाबत नि. क्र. ६ अन्वये प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे.

प्रकरणांतील निकालाचे आदेशाविरुध्द मा. उच्च न्यायालयात अपील अथवा स्थगणादेश नसल्याबाबतचा अहवाल संबंधित लिपीक यांनी दिलेला आहे. मुळ अभिलेखाची फक्त “ए” फाईल उपलब्ध आहे. मुळ अवार्ड वरुन असे

दिसुन येते की, अर्जदाराने प्रकरणांत आवश्यक असलेली संपूर्ण कोर्ट फी भरली आहे. वरील मुदत ठेव पावतीची परिपक्वता झालेली आहे. त्यामुळे सदर अर्जदारास मुदतठेवीची रक्कम देणे योग्य होईल.

करिता खालील प्रमाणे आदेश पारीत करण्यात येते.

**आदेश**

मुळ प्रकरणातील अर्जदार क्र. २ **नंदा शंकरराव सहारे (नंदा कैलास नेवारे लग्नानंतरचे नाव)** यांना एफ.डी.आर. खाता क्र. ०१२९२०२८९६४०१ मधे जमा असलेली रक्कम रुपये **१,४५,७७६/- (अक्षरी रुपये एक लाख पंचेचाळीस हजार सातशे छाहत्तर फक्त)** एवढी व्याजासह तिचे पडताळणीअंती प्रदान करण्यांत यावी. याप्रमाणे अर्ज निकाली काढण्यात येतो.

HEMANT BHAGWANTRAO GAIKWAD

Digitally signed by HEMANT BHAGWANTRAO GAIKWAD
Date: 2026.09.07 18:22:33 +0530

दिनांक: ०७/०९/२०२६

(हिमंत भ. गायकवाड)
अध्यक्ष,
मोटार अपघात प्रकरण न्यायाधिकरण,वर्धा